# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 28.01.2025** **वार-मंगळवार**

---

**जीबीएस**

राज्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमच्या रुग्णांची संख्या 110 झाली आहे. सध्या 13 रुग्ण जीवरक्षक प्रणालीवर आहेत. राज्यातील एकंदर रुग्णांपैकी 73 पुरुष आणि 37 महिला आहेत. सर्वाधिक रुग्ण पुणे परिसरात आहेत, त्यात पुणे महापालिका परिसरात 88, पिंपरी-चिंचवड महापालिका भागात 15 आणि जिल्ह्यात इतर ठिकाणी सात रुग्ण आहेत. राष्ट्रीय विषाणु विज्ञान संस्था म्हणजेच 'एनआयव्ही'कडे 73 रुग्णांचे शौच नमुने पाठविण्यात आले. त्यात 12 नमुन्यांमध्ये नोरोव्हायरस हा विषाणू संसर्ग आणि 3 नमुन्यांमध्ये कॅम्पायलोबॅक्टर जेजुनी हा जीवाणू संसर्ग आढळून आला. अद्याप 39 नमुन्यांची तपासणी पूर्ण झाली नाही, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली आहे.

**जागतिक आरोग्य संघटना पथक**

दरम्यान जीएसबीच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटनेच्या पथकाने पुण्यात पाहणी केली. या पथकाने पुण्यातील नांदेड गावात महापालिका अधिकाऱ्यांसह फिरून पाहणी केली.

**मुरलीधर मोहोळ**

जीबीएसच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, आरोग्य प्रमुख डॉ. नीना बोराडे यांच्याशी चर्चा करून आज आढावा घेतला. गुलियन बॅरी सिंड्रोमच्या रुग्णांसाठी महापालिकेच्या कमला नेहरू रुग्णालयात मोफत उपचार होणार आहेत. तर खासगी रुग्णालयातील रुग्णांना 'शहरी गरीब योजने'तून दोन लाख रुपयांपर्यंतची मदत केली जाणार आहे. या आजारासाठी दिलं जाणारं 'इम्युनोग्लोब्यूलिन' हे इंजेक्शन देखील मोफत उपलब्ध करून दिलं जाईल, अशी माहिती मोहोळ यांनी दिली.

**जीबीएस**

पिंपरी चिंचवडमध्येही जीबीएस आजाराचे 15 संशयित रुग्ण आहेत. दूषित पाण्याद्वारे आजार पसरण्याची शक्यता गृहीत धरण्यात आली असून या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त शेखरसिंह यांनी शहरातील खाजगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करणाऱ्या तसंच जारमधून वितरित होणाऱ्या पाणी नमुन्यांची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. या आजाराचे उपचार एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.

**पुणे म्हाडा सोडत**

पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळातर्फे गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये जाहीर करण्यात आलेल्या सोडतीचा कार्यक्रम मंत्रालयातून उद्या ऑनलाइन पद्धतीने होणार आहे. उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ही सोडत होणार

आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती असेल. 3 हजार 662 सदनिकांसाठीच्य या सोडतीसाठी एकंदर 93 हजार 662 अर्ज आले होते. 71 हजार 642 अर्जदारांनी अनामत रक्कम भरली असून, त्यांचा सोडतीत समावेश केला आहे.

**<u>पुणे मनपा</u>**

पुणे महापालिकेच्या अभ्यागत कक्षात किओस्कची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या किओस्क सुविधेचं आणि शहर अभियंता अभ्यागत कक्षाचं उद्घाटन पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्या हस्ते झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 100 दिवसांच्या सात कलमी कृती आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व शासकीय संस्थांना दिले आहेत. त्यानुसार महापालिकेच्या शहर अभियंता कार्यालयाने नागरिकांना विविध सेवांबाबत माहिती आणि कागदपत्रांची माहिती सहज उपलब्ध व्हावी म्हणून हा उपक्रम सुरू केल्याचं पुणे महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी सांगितलं.

**<u>दावोस</u>**

दावोसमधील जागतिक आर्थिक परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्य शासनाने पुण्यातील रूरल एन्हान्सर्स संस्थेशी 10 हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार केला. आरोग्यसेवा, रुग्णालय, पायाभूत सुविधा, बंदरे आणि सामाजिक क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी हा सामंजस्य करार महत्वपूर्ण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संस्थेचे प्रमुख अंबर आयदे यांनी या कराराचं आदान-प्रदान केलं. ही गुंतवणूक पुढच्या दोन वर्षांमध्ये राज्यातील आरोग्य व्यवस्था, राज्य शासनासाठी लागणारी रुग्णवाहिका व्यवस्था, लोहगावचा पोलिसांसाठीचा गृहप्रकल्प, पायाभूत सुविधांची उभारणी करण्याच्या दृष्टीने उपयोगात आणण्यात येणार आहे, असं अंबर आयदे यांनी सांगितलं.

**<u>पिंपरी-चिंचवड-कर</u>**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागानं थकबाकीदारांच्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरू केली आहे. थकबाकीदारांच्या थकीत रकमेवर प्रतिमहिना 2 टक्क्यांचा विलंब दंडही वाढत आहे. त्याबरोबरच ज्या मालमत्ताधारकांनी आपल्या पाणीपट्टीचा भरणा केलेला नाही, अशा मालमत्तांची नळ जोडणी खंडित करण्याची कारवाईही सुरू आहे. मालमत्ताकर भरण्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी करसंकलन विभागाने बक्षीस जाहीर केलं असून रीलस्टार, संगीतकार, रॅपर यांच्यासाठी स्पर्धाही आयोजित केली आहे. या कलाकारांनी आपल्या कलेच्या माध्यमातून नागरिकांना मालमत्ताकर भरण्याचं आवाहन करावं असं कर संकलन विभागानं म्हटलं आहे.

**<u>क्रीडा स्पर्धा</u>**

महाराष्ट्रीय मंडळाच्या चंद्रशेखर आगाशे शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्यावतीने धनंजय दामले यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आंतर-शालेय आणि आंतर-महाविद्यालय 'ऑप्टी रेस' अडथळा सांघिक स्पर्धा आजपासून सुरू होत आहे. ही स्पर्धा 30 जानेवारी पर्यंत चालणार आहे. स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील 160 संघांनी सहभाग घेतला आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 35 तर किमान तापमान 15 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल आणि दुपारनंतर आकाश अंशतः ढगाळ राहण्याचा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**